
ISSN 2394- 5303

# PRINTING Area®

Peer Reviewed International Refereed Research Journal




Editor
Dr.Bapu G.Gholap

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

November 2020, Issue-71, Vol-05

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

13) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या विज्ञान विषयातील संपादणूक, अभिवृत्ती व वैज्ञानिक अभिवृत्ती ...
प्रा.डॉ. डी. झेड. चौधरी, नंदुरबार ||63

14) कल्पनावादाच्या खंडनाची मूरची तार्किक पद्धत
प्रा. सुमेरू गोंडाणे, नागपूर ||66

15) कोल्हापूर जिल्ह्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास (२००२ ते २०१२)
डॉ. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे, जि. कोल्हापूर ||69

16) शिक्षण सर्वांचे सर्वांसाठी माफक दरात.. Education at a decent rate for all ..
प्रा. व्यंकट आनंदराव सोळंके, नांदेड ||73

17) भारत–श्रीलंका सम्बन्ध: संघर्ष से सहयोग तक के विशेष सन्दर्भ में
डॉ० अखिलेश कुमार यादव, एटा (उ०प्र०) ||78

18) सतरंगी क्रांति और गैर–कांग्रेसवाद
डा. रिंकु कुमारी, पूर्णियाँ ||84

19) लड़कियों की शिक्षा : एक अच्छा राष्ट्रीय निवेश
डा. रिभा सिंह, सहरसा ||88

20) जनस्वास्थ्य एंव भारत में स्वास्थ्य सेवाएँ
डा. आंकाक्षा आनन्द, मधेपुरा ||92

21) ग्रामीण महिला रोजगार में स्वयंसहायता समूहों का योगदान
डा० कविता, मधेपुरा ||95

22) ब्रिटिश काल में आधुनिक उद्योगों को प्रोत्साहन
डा. अजीत कुमार, सहरसा ||100

23) आर्थिक योजनाकाल में भारत का विदेशी व्यापार
डा. मिथिलेश कुमार, मधेपुरा ||103

24) भारत में समाजवादी आन्दोलन
शशि भूषण, अररिया (बिहार) ||107

25) डॉ. लोहिया के समाजवादी विचार
डा. मुकेश कुमार, मधेपुरा ||111

26) उच्च शिक्षा के परिप्रेक्ष्य में ग्रामीण महिलाएं
डा. रानी कुमारी, मधेपुरा ||115

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

च्या ह्या तिसऱ्या अर्थाला नाकारतो.

'Refutation of Idealism' ह्या लेखाच्या पहिल्या भागात मूर "To be is to be perceived" ह्या कल्पनावादी **युक्तिवादातील** अपरिहार्य अशा **आधारविधानाचे** खंडन त्यातील श्पेश ह्या संयोजकाचे तीन भिन्न अर्थ दर्शवून करतो. पहिल्या अर्थानुसार "To be is to be perceived" हे विधान **पुनरूक्तिरूप** ठरत असल्यामुळे मूर तो अर्थ नकारतो. दुसऱ्या अर्थानुसार ते **व्याघाती** ठरते म्हणून तो त्याला नकारतो. तर तिसऱ्या अर्थानुसार ते विधान **आत्मव्याघाती** ठरते म्हणून तो त्याचा नकार करतो.

अशा प्रकारे कल्पनावादाच्या खंडनाच्या पहिल्या भागात आपणाला **युक्तिवाद**, **आधारविधान**, **पुनरुक्ती**, **व्याघात** व **आत्मव्याघात** ह्या तर्कशास्त्रीय संकल्पनांच्या साहाय्याने कल्पनावादी युक्तिवादाच्या **आधारविधानाचे** खंडन करताना मूर दिसतो म्हणून "To be is to be perceived" ह्या विधानाचे खंडन करून कल्पनावादाच्या खंडनाच्या ह्या प्रयत्नाला कल्पनावादाचे तार्किक पद्धतीने केलेले खंडन म्हणता येईल.

**संदर्भ**


१) दि. य. देशपांडे — 'मूरचे तत्त्वज्ञान' दि. य. देशपांडे गौरवनिधी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९८६, प्रस्तावना — पृष्ठ — २

२) डॉ. बैन्जामिन खान — 'समसामयिक वस्तुवाद' मध्य प्रदेश हिन्दी ग्रंथ अकादमी, भोपाल, प्रथम संस्करण—१९७३, पृष्ठ — १३१

३) दि. य. देशपांडे — 'मूरचे तत्त्वज्ञान' दि. य. देशपांडे गौरवनिधी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९८६, प्रस्तावना — पृष्ठ — ८

४) दि. य. देशपांडे — 'मूरचे तत्त्वज्ञान' दि. य. देशपांडे गौरवनिधी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९८६, प्रस्तावना — पृष्ठ — ८

५) दि. य. देशपांडे — 'मूरचे तत्त्वज्ञान' दि. य. देशपांडे गौरवनिधी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९८६, पृष्ठ — ८

६) दि. य. देशपांडे — 'मूरचे तत्त्वज्ञान' दि. य. देशपांडे गौरवनिधी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९८६, पृष्ठ — ८

७) बी. के. लाल — 'समकालीन पाश्चात्त्य दर्शन' मोतीलाल बनारसीदास, तृतीय संस्करण, १९९४, दिल्ली पृष्ठ — १५५


15

# कोल्हापूर जिल्ह्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास (२००२ ते २०१२)


**डॉ. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे**
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर


**********

**प्रस्तावना**

प्रस्तुत अध्ययनात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात पीएच्.डी प्राप्त प्रबंधाचा सारांश दिला आहे. हा प्रबंध सामाजिक न्याय, राज्य व स्थानिक प्रशासन व दलित वस्तीतील रहिवाशी यांच्यांशी संबंधीत आहे. संशोधनाचा उद्देश राज्यशासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचा खर्च दलित वस्तीत खर्च केला आहे काय? यातून दलित वस्तीत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे हा आहे.

**प्रकरण रचना**

प्रस्तुत प्रबंधाची सहा प्रकरणात विभागणी केलेली आहे.

प्रकरण : १ प्रस्तावना

प्रकरण : २ कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांचे स्थान आणि दलित वस्ती सुधारणा योजना

प्रकरण : ३ ग्रामीण दलित वस्ती सुधारणा योजनेची अंमलबजावणी

प्रकरण : ४ ग्रामीण दलित वस्ती सुधारणा योजनेचे मूल्यमापन

प्रकरण : ५ नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेची अंमलबजावणी आणि मूल्यमापन

प्रकरण : ६ उपसंहार व निष्कर्ष

पुढील भागात संशोधन प्रबंधाचा प्रकरणाक्रमे सारांश दिलेला आहे.

**प्रकरण : १ प्रस्तावना**



PRINCIPAL
Shivaraj College of Arts, Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Dist.Kolhapur)

दलितांच्या परंपरागत सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक अवस्थेविषयी या प्रकरणात विश्लेषण केलेले आहे. महाराष्ट्रातील दलित वस्तींची संख्या, कोल्हापूर जिल्ह्यातील दलित वस्तींची संख्या, दलित वस्तीची व्याख्या, दलित वस्तीची वैशिष्ट्ये, दलित वस्ती सुधारणा योजनेची सुरूवात याचबरोबर पूर्व अभ्यास अवलोकन इत्यादी घटकांची संशोधनात मांडणी केली आहे. यासाठी खालील संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

### संशोधन उणीव

साहित्य सर्वेक्षणामध्ये अनुसूचित जातीसाठी विविध ग्रंथांचे, लेखाचे आणि शोधनिबंधामध्ये दलित विकासापासून व मानसन्मानापासून वंचित कसे राहिले आहेत याचे विवेचन साहित्यातून दिसते. त्याचबरोबर दलितांच्या उन्नतीसाठी विविध योजना राबविल्या जातात याचाही अभ्यास दिसतो. परंतु वरील साहित्यात कोल्हापूर जिल्ह्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास झालेला दिसून येत नाही. ही एक महत्त्वाची संशोधन उणीव दिसते. प्रस्तुत संशोधनात दलितांचे सामुदायिक राहणीमान उंचावण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात राबविलेल्या दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास केलेला आहे.

### संशोधन प्रश्न

महाराष्ट्र शासन दलितांचे राहणीमान उंचावण्यासाठी दलित वस्ती सुधारणा योजनेसाठी निधी मंजुर करते. हा निधी २ लाखांपासून २० लाखांपर्यंत मंजुर केला जातो. शासनाचे कोट्यावधी रूपयांचे अनुदान जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना दिले जाते. या निधीचा वापर दलितांच्या विकास कामांसाठी झालेला आहे का? दलितांच्या मिळणाऱ्या निधीचा वापर दलित वस्तीत केला जातो का? पिढ्यानुपिढ्या विकासापासून वंचित राहिलेल्या समाजाला या योजनेचा किती प्रमाणात लाभ झाला आहे, तसेच याची अंमलबजावणी कोल्हापूर जिल्ह्यात कशी होते हा एक संशोधनाचा प्रश्न आहे. याकरीता ''कोल्हापूर जिल्ह्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास (२००२–२०१२)'' या प्रश्नावर संशोधन केले आहे.

### संशोधन महत्त्व

दलितांना पायाभूत सुविधा प्राप्त व्हाव्यात, त्यांचा सामाजिक स्तर उंचवावा याकरीता दलित वस्ती सुधारणा योजनेसाठी महाराष्ट्र शासन निधी देते. दलितांचा विकास व्हावा ही शासनाची सामाजिक न्यायाची भूमिका आहे. दलित वस्तीच्या विकासासाठी शासनाने आखलेली ही महत्त्वकांक्षी योजना आहे. दलित वस्तीतील लोकांना प्राप्त झालेल्या सुविधांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. दलित वस्ती सुधारणा योजनेतून झालेल्या कामातून दलितांच्या राहणीमानाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. या दृष्टिने कोल्हापूर जिल्ह्यातील दलित वस्ती सुधारणा योजना या विषयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

### संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही कोल्हापूर जिल्ह्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या गावातील अनुसूचित जातीतील दलित वस्त्यांमधील राबविलेल्या दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास केलेला आहे. या अभ्यासाची व्याप्ती कोल्हापूर जिल्हा व दलित वस्ती सुधारणा याच्याशी संबंधीत आहे.

१) दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास कोल्हापूर जिल्ह्यापुरता मर्यादीत आहे.

२) दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास २००२ ते २०१२ या कालावधीत दलित वस्तीत राबविलेल्या 'दलित वस्ती सुधारणा योजनेचा' अभ्यास केलेला आहे.

३) प्रस्तुत संशोधन कोल्हापूर जिल्ह्यातील ६० गावे व ४ शहरांशी मर्यादीत आहे.

### उद्दिष्ट्ये

१) दलित वस्तीतील दलितांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) दलित वस्ती सुधारणा योजनेविषयी दलित वस्तीतील नागरिकांच्या जाणीव जागृतीचा अभ्यास करणे.

३) दलित वस्ती सुधारणा योजनेच्या अंमलबजावणीची माहिती करून घेणे.

४) दलित वस्ती सुधारणा योजनेने दलित वस्तीतील झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

५) अनुसूचित जातीतील लोकप्रतिनिधींनी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

६) दलित वस्ती सुधारणा योजनेच्या अंमलबजावणीच्या समस्या व त्यावरील उपाय सुचविणे.

**गृहितके**

१) दलितांची सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक स्थिती सुधारली आहे.

२) दलित वस्ती सुधारणा योजनेविषयी दलित नागरिक जागृत आहेत.

३) दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी दलित वस्तीत खर्च केला आहे.

४) दलित वस्ती सुधारणा योजनेने दलित वस्तीत सुधारणा झालेली आहे.

५) दलित वस्ती सुधारणा योजना राबविताना अनुसूचित जातीच्या प्रतिनिधींना विश्वासात घेतले जात नाही.

६) दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी विकास कामासाठी अपूर्ण आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी सर्वेक्षण व ग्रंथालयीन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. संशोधनासाठी माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे. ती साधने पुढीलप्रमाणे.

**प्राथमिक साधने**

जेव्हा संशोधन कर्ता हा अध्ययन क्षेत्रात जाऊन स्वत: ज्या साधनांद्वारे तथ्य संकलित करतो त्यास प्राथमिक स्त्रोत असे म्हणतात. पी.व्ही. यंग यांनी निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली व अनुसूची इत्यादी प्राथमिक स्त्रोताची माध्यमे असल्याचे प्रतिपादन केले आहे (आगलावे प्रदीप, : २०३). या दृष्टिकोनातून संशोधकाने मुलाखत अनुसूचीचा वापर केला आहे. प्राथमिक साधनामध्ये २००२ ते २०१२ या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यातील संशोधनासाठी निवडलेल्या गावात व शहरात दलित वस्ती सुधारणा योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे झालेली आहे याविषयी निरीक्षण, मुलाखत अनुसूची इत्यादी प्राथमिक साधनांच्या आधारे संशोधन पूर्ण केले आहे.

३४६ नागरिकांच्या मुलाखती अनुसूची घेतलेली आहे. महार, मातंग, चर्मकार, खाटीक, ढोर या समाजातील सर्व उत्तरदात्यांची मुलाखत अनुसूची घेतलेली आहे. १३३ लोकप्रतिनिधींमध्ये महार, मातंग आणि चर्मकार इत्यादींचा समावेश आहे.

नागरी भागातील ६२ नागरिकांच्या मुलाखत अनुसूची घेतलेल्या आहेत. यामध्ये महार, मातंग, चर्मकार या समाजातील उत्तरदात्यांचा समावेश आहे. तसेच २० लोकप्रतिनिधींच्या मुलाखत अनुसूची घेतलेल्या आहेत. महार, मातंग, चर्मकार, ढोर या उत्तरदात्यांच्या मुलाखती अनुसूची घेतलेल्या आहेत.

**दुय्यम साधने**

जी सामुग्री (तथ्ये) स्वत: संशोधकाचे नसून अन्य व्यक्ती व संस्था यांच्याद्वारे संकलित केले जाते. प्रकाशित व अप्रकाशित अशा स्वरूपात असून त्यात लिखित प्रलेखांचा आंतरभाव होतो त्या सामुग्रीला द्वितीय सामुग्री असे म्हणतात (आगलावे प्रदीप, : २०३).

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. विविध विद्यापीठात सादर करण्यात आलेले अप्रकाशित शोधप्रबंध, संदर्भ ग्रंथ, लेख, पुस्तके, जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक –आर्थिक समालोचन, गॅझेटियर, शासकीय अहवाल, दैनिक वर्तमान पत्रे, मासिके, इंटरनेट, कोल्हापूर जिल्हा परिषदेने मंजुर केलेला बृहत आराखडा, जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत निधीचे केलेले वाटप व खर्च याची नोंदवही यांचा वापर केलेला आहे. याचबरोबर ग्रामपंचायत, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांमधून संकलित केलेली माहिती तसेच शासकीय संस्थांच्या कार्यालयामधून योजना, धोरणे, कायदे, नियम, अधिनियम बदललेले आहेत त्याद्वारे योजनांच्या कार्यात झालेल्या बदलाचा अभ्यास याद्वारे केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनात कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांची लोकसंख्या अधिक असलेली गावे, दलितांच्यामधील उपजातींची संख्या असलेली गावे, गावातील अनुसूचित जातीने सरपंचपद भूषविलेली